**Lokshahi Warta, Nagpur, Aug 31 2012**

# ‘टीसीएस’ आयटी विझमध्ये सेंटर पॉईंट स्कूल विजयी

## चेन्नई येथे होणार अंतिम फेरी



चैतन्य साठे व डॉ. आर.के. इंगळे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना आयटी विझमध्ये विजयी संघाचे पारितोष कान्हे व अनिरुद्ध मोरारका.

**लोकशाही वार्ता / ३० ऑगस्ट**

**नागपूर :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे आयोजित 'आयटी विझ'च्या नागपूरमधील प्रथम पर्वात सेंटर पॉईंट स्कूलचा गट विजयी ठरला आहे. या गटाने विविध फेरीतून आलेल्या पाच गटांना पराभूत केले.

'टीसीएस'तर्फे गेल्या तेरा वर्षांपासून देशभरातील प्रमुख शहरांमध्ये आयटी प्रश्नमंजूषा स्पर्धा आयोजित करीत आहे. यंदा प्रथमच नागपूर आणि इंदूर या शहरांचा या स्पर्धेत समावेश करण्यात आला. नागपूरच्या या प्रथम पर्वाला गुरुवारी डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात प्रारंभ झाला. या स्पर्धेत शहरातील विविध शाळांतील दीड हजारच्या जवळपास विद्यार्थी सहभागी झाले होते. विविध फेऱ्यांतून अंतिमतः सहा शाळांचे गट शेवटच्या फेरीत पोहोचले. या सहा गटांमध्ये भोसला मिलिटरी स्कूल, नारायण विद्यालय, भवन्स बीपी विद्या मंदिर, सेंटर पॉईंट स्कूल, दिल्ली पब्लिक स्कूल आणि भवन्स या शाळांतील गटांचा समावेश होता. शेवटच्या फेरीत सेंटर पॉईंटच्या अनिरुद्ध व पारितोष या विद्यार्थ्यांनी बाजी मारत दिल्ली पब्लिक स्कूलच्या अभिषेक व अबू बाकर या विद्यार्थ्यांना मागे टाकले. यावेळी विजेत्यांना व उपविजेत्यांना, तसेच शेवटच्या फेरीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. आता सेंटर पॉईंटच्या विद्यार्थ्यांना देशभरातून आलेल्या उत्कृष्ट संघासोबत ८ डिसेंबर रोजी चेन्नई येथे संघर्ष करावा लागणार आहे. याप्रसंगी टीसीएसचे उपाध्यक्ष चैतन्य साठे व व्हीएनआयटीचे अधिष्ठाता डॉ. आर.के. इंगळे उपस्थित होते. ही स्पर्धा नागपूरसह हैदराबाद, अहमदाबाद, कोलकाता, बेंगळुरू, चेन्नई, कोईम्बतूर, पुणे, इंदूर, भुवनेश्वर, कोची, लखनऊ, मुंबई आणि दिल्ली येथे घेण्यात येत आहे.

+++

### नागपूरकरांना सज्ज होण्याचे संकेत - चैतन्य साठे

आयटी प्रश्नमंजूषा म्हणजे, नागपूरच्या विद्यार्थ्यांना येत्या काळात उत्तम संधीसाठी सज्ज होण्याचे संकेतच असल्याचे टीसीएसचे उपाध्यक्ष चैतन्य साठे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. सुमारे ३०० कोटी रुपयांची गुंतवणूक असलेले 'टीसीएस' प्रकल्प नागपूरमध्ये सुरू झाले असून, डिसेंबर २०१३ पर्यंत या प्रकल्पातील पहिला टप्पा पूर्ण होणार असल्याचे साठे यांनी यावेळी सांगितले. पहिल्या टप्प्यात आम्हाला साडे आठ हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासणार असून, त्यानंतर दुसऱ्या टप्प्याला प्रारंभ होणार असल्याचे साठे बोलताना म्हणाले. सध्या जागतिक पातळीवर मंदीचे सावट पसरले आहे. परंतु, आंतरराष्ट्रीय स्तरावरील कंपन्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी अशी स्थिती अद्याप नसल्याचे सांगितले. त्यामुळे आमच्या कोणत्याही कार्यावर त्याचा परिणाम होणार नसून, नियोजित वेळेत आमचे काम पार पडणार असल्याचे साठे यांनी सांगितले. आमचा मुख्य भर भारतातून जगभरात सेवा पुरविण्यावर आहे. ते आम्हाला आणि आमच्या ग्राहकांनाही सोयीचे ठरणार असल्याचे साठे यावेळी म्हणाले.